
RAINDROP IN THE DROUGHT: GODAVARI DANGE



TEXT: REETIKA REVATHY SUBRAMANIAN
ILLUSTRATIONS: MAITRI DORE

Proofreader: Gary Crabb

Transcriber: Anupamaa Joshi

The *Raindrop in the Drought: Godavari Dange* comic of Reetika Revathy Subramanian and Maitri Dore was developed as part of Movements and Moments – Feminist Generations, an initiative of Goethe-Institut. The project aims to make visible Indigenous feminist activism and protagonists from the Global South by relating their life stories in the highly accessible format of comics.



We would like to extend our gratitude to Godavari Dange for trusting us with her story and sharing her journey with us. Special thanks to Godavari *tai*'s family, friends, and colleagues at Swayam Shikshan Prayog, Osmanabad for their time, patience, and unstinting hospitality.

Telling a story through comics is never easy, but conversations with Nacha Vollenweider and the Goethe-Institut Indonesien team helped us bring Godavari *tai*'s journey to life, one panel at a time.

This book is dedicated to all the women farmers of Marathwada.

GLOSSARY

Aai: Mother

Aaku: Godavari Dange's name at home

Baba: Father

Bachat-gat: Small-savings group/ Self-help group

Bhakri: Flat round bread made of millets popular among rural communities in western India


Dada: Elder brother


Guntha: Land parcel measuring approximately 1,000 square feet

Tai: Elder sister

Taluka: Sub-district


CHAPTER 1: THE BEGINNING





Back in the late 1960s, the Indian government had introduced new farming techniques to transform dry lands into lush rice and wheat fields.
Up north, farmers in Punjab, Haryana and Uttar Pradesh were celebrating the success of the green revolution.
GREEN REVOLUTION
DELHI
RIVER GANGA
INDIA
MAHARASHTRA
MUMBAI
RIVER GODAVARI
But back home in Marathwada, we were still recuperating from the deadly 1972 drought.
The River Godavari is India's second longest river. She is worshipped as Goda Maai, the mother who gives life and nurtures. The cyclical droughts had rendered the river dry.
MARATHWADA
GANDHORA

It was the worst drought that the people of Marathwada had experienced in nearly half a century.




Several families went without food and water for days on end. Women quarreled for every last drop.

OH GOD! WE HAVE RUN OUT OF WATER.





Girls were forced to drop out of school and support their families.


With their crops wilting and no income in sight, small farmers, mostly men, migrated to the cities to find jobs.




CHAPTER 2: THE EARLY DAYS








After school, Archana and I would explore Gandhora together. She was my best friend.
COME! LET'S CLIMB TO THE VERY TOP.
She needed some convincing at times...


... but eventually gave in to my adventurous spirit. We made a good team.
ALMOST THERE!
Today she is Tuljapur's first woman postmaster.




From the treetops we would gaze out at the fields.


It wasn't hard to tell which fields belonged to the 'upper' caste families based on the green cover below. In the drought-prone parts of Marathwada, the rich farmers grew lots of sugarcane, one of the greatest water guzzlers imaginable.





Meanwhile, the poor farmers, often from marginalized caste groups, owned very small pieces of arid land. They suffered from repeated cycles of failed monsoons, failed crops, bad debts, and desperation. They spent all their savings to sink new borewells.




AAKU, WHAT ARE YOU DOING UP THERE? GET DOWN AND HELP AAI!
Sunil often played spoiler to our adventures.


That year, too, the rains didn't arrive. We had to walk nearly two kilometers to fetch water.
Very soon, the money started to dry up.



AAI, WHY ARE WE SELLING YOUR FAVORITE NECKLACE?
WE HAVE NO FOOD TO EAT.
The debts taken for my sister's wedding dowry also kept mounting.


To make things worse, I was promoted to senior school, which was a whole village away. There were no buses.
HOW WILL WE SEND HER TO SCHOOL?
WE NEED TO PULL HER OUT.


CHAPTER 3: BACK TO SCHOOL



I really wanted to keep learning and return to school, but I did not have any free time.



Anita Kulkarni lived next door. She belonged to the dominant *Brahmin* caste. Women of her community were not allowed to go out of the house for work. But she was different. She was a strong and independent woman. She drove a tractor, ploughed the fields, and did all the work on the farm.





Kulkarni *tai* practiced organic farming. While most big farmers in the village grew only cash crops like sugarcane and soyabean which they sold for profit, she taught me to grow lentils, millets, and leafy greens. She never used harmful pesticides and chemical fertilizers.




I spent hours with her on her farm learning every little technique of sowing, ploughing, and harvesting.






She paid me five rupees a day, and I learned how to grow food from scratch. It was so much fun!




It was also a really tough job. Kulkarni *tai* and the other women in my village worked very hard and kept long hours on the fields.
Yet they were never recognized as farmers. Only the men in the village could own farmland. They treated the women as laborers.



However, my biggest joy was to see the tiny seeds transform into food, from the farm to our plate. We no longer needed to buy vegetables and grains from the market.
SURPRISE!

CHAPTER 4: A FAMILY OF MY OWN

I spent the next three years working closely with Kulkarni *tai*. Until one day, in 1994, Sunil summoned me abruptly from the fields.



The next thing I knew I was surrounded by 25 new faces. I was married to Shreedhar Kshirsagar, who was ten years older than me. I was only 16. I had to leave Gandhora and Kulkarni *tai*'s farm.



Life in my new house was very different. My husband lived in a large joint family. My days began early and ended late. Back in Gandhora, *Aai* would make sure that we ate all our meals together. But here, the men and boys always ate first.

GET SOME MORE HOT *BHAKRIS*.

And the women had to make do with whatever was left behind. Often this meant having to sleep on an empty stomach.

THERE IS ONLY A SPOONFUL FOR US.

But my husband was kind and loving.




In our four years together, we built a little world of our own. We had two sons, Shubham and Sushant.







But very soon, my life came to a screeching halt. In 1998, Shreedhar died in a road accident.




CHAPTER 5: BEGINNING AGAIN




I moved back to my mother's house in Gandhora.



The next year went past like a blur.
I was 21, a mother, and a young widow.




Aai was a member of the *bachat-gat*, a small-savings group for women in Gandhora. The group was created in the aftermath of the 1993 earthquake that killed nearly 10,000 people across Marathwada. Many more lost their homes and livelihoods. Coupled with the drought, the women suffered the hardest. One afternoon, Naseem *tai* led a meeting with the women in our village.



As I listened to the women speak, one thing became clear: I was not alone.

DOES ANYONE KNOW HOW TO READ AND WRITE?

My limited years at school helped. But I struggled with numbers.



As time went by, I found my way with addition and subtraction. In listening and speaking to the other women, I began to rebuild my life and define its new purpose.

CHAPTER 6: FROM LAB TO LAND

In 2007, Marathwada was hit by another drought. There was little water for agriculture. The rich farmers began to sink even deeper borewells in desperate attempts to grow cash crops. The poorer women stared at another year of uncertainty, loss, and hunger.



It was difficult for me to convince the women to try food crops. Their husbands refused to spare even half an acre of land for them. I knew only one person would trust me without question – my dear friend Archana.



Archana began to grow a mixed set of crops including some millets, pulses, and leafy greens on her land. They grew well with comparatively little water.

As the word spread, more and more women came forward with their little pockets of land.

HERE, TRY THESE RADISHES, LENTILS AND BEANS. MAKE SURE TO TREAT THE SOIL WELL BEFORE YOU SOW.


From time to time, we invited scientists from Krishi Vigyan Kendra, the government's farm science center, in Osmanabad. They advised on scientific farming techniques to conserve water and improve the overall yield. The farmers began to introduce hydroponics, drip irrigation and sprinklers on their small patches of land.



The drought was no longer a nightmare for these women farmers. The results of the lab-to-land model were in front of our eyes.



After years of trial and error, we finally built a model that combined the local climate patterns with the women's own social pressures. The one-acre model supported 36 varieties of drought-resistant and short-term crops – such as leafy vegetables, grains, and lentils – on half to one acre of land. Based on the season, we chose different varieties of seeds. Our goal was to ensure food for all, all year round.




But it wasn't easy for all the women. Many still had to deal with the 'upper' caste village headmen, unsupportive government authorities, and abusive husbands.



CHAPTER 7: AND THE RIVER FLOWS ON


The one-acre model was put to the test in 2012. Marathwada experienced its worst drought in 40 years. There was not even a single drop of water to drink and farm. We had to rely on government tankers and private water sellers. Every day became a challenge.



Amidst this scarcity, the farmers cultivating cash crops failed miserably. Without water, the cane began to wilt and die. Driven by debt, thousands of farmers died by suicide. Our women farmers, however, stayed afloat.




To my joy, the women transformed into local leaders. They influenced many others to build their own one-acre models. Even the men realized the value of food crops during the drought years and began to support us. We linked the women to government schemes and subsidies, as well as the local markets. This gave them personal savings.




As the model began to achieve local success, I got the opportunity to share our experiences with activists, NGO leaders, and practitioners around the world. There has also been much to learn from the ways in which they are fighting climate change.





In the past ten years, I have travelled to 17 countries. Every time I am airborne, I try to look for the fields of Gandhora, now green, thanks to the strong fight put up by our women farmers.
FORGET AMERICA, I HAVEN'T EVEN BEEN TO DELHI.
I HAVEN'T EVEN STEPPED OUT OF GANDHORA.
SHE MAKES US SO PROUD.

When the COVID-19 pandemic hit us, inter-state borders were sealed, markets were shut, hunger and distress began to mount. The large farmers incurred huge losses because there were no takers for their harvested cash crops.



The women, however, remained undeterred. All the fresh food crops they grew in their one-acre plots kept their families nourished. Some women even sold the surplus in the local wholesale markets for a profit. As shareholders of the Vijayalakshmi Sakhi Producer Company, they bargained for the right price in this male-dominated setting.

We have come a long way, but we still have many battles to win. The one-acre model should reach every village. Women from every household should be recognized as producers and landowners. They should be everywhere. Together, nothing is impossible.



My name is Godavari. And like the river, I will never cease to flow.



REETIKA REVATHY SUBRAMANIAN

is a journalist and researcher from Mumbai, India. She is currently pursuing her PhD in Gender Studies as a Gates Cambridge Scholar at University of Cambridge, UK. Through her work that is anchored in intersectional feminist politics, she aims to reconcile collaborative storytelling with pressing marginalized realities.



MAITRI DORE

is an architect and freelance illustrator from Mumbai, India. Through her illustrations, she attempts to highlight the struggles of oppressed communities in India, focusing on gender, caste, and religion. She is currently pursuing a PhD in cultural heritage conservation at the University of Gothenburg, Sweden.

दुष्काळात पावसाचा थेंब: गोदावरी डांगे



लेखन: रीतिका रेवती सुब्रमणियन
चित्रे: मैत्री डोरे

प्रतिलेखन: अनुपमा जोशी

'दुष्काळात पावसाचा थेंब: गोदावरी डांगे' हे चित्रमय पुस्तक रीतिका रेवती सुब्रमणियन आणि मैत्री डोरे यांनी Goethe-Institut Indonesien च्या Movements and Moments – Feminist Generations या उपक्रमादरम्यान तयार केले. या उपक्रमाचे उद्दिष्ट विकसनशील देशांमधील स्त्रीवादी कार्यकर्त्यांच्या कामाची माहिती पुढे यावी हा आहे. विविध देशांतल्या स्त्रियांच्या गोष्टी सर्वदूर सहज पोहोचाव्यात म्हणून चित्रमय पुस्तके (कॉमिक्स) या उपक्रमांतर्गत बनवली आहेत.





ऋणनिर्देश

या पुस्तकाच्या कामासाठी गोदावरी डांगे यांनी आमच्यावर पूर्ण विश्वास ठेवून त्यांचा आजवरचा प्रवास आम्हाला मोकळेपणाने सांगितला, याबद्दल आम्ही त्यांच्या ऋणी आहोत. गोदावरीताईंचे कुटुंबीय, मित्र-मैत्रिणी आणि स्वयम् शिक्षण प्रयोग (उस्मानाबाद) या संस्थेतील त्यांचे सहकारी या सर्वांनी आम्हाला खूप मदत केली, वेळ दिला आणि वेळोवेळी पाहुणचारही केला, त्याबद्दल त्यांचेही मनापासून आभार.


एखादी गोष्ट चित्रांमधून सांगणे सोपे नसते. त्या कामासाठी नाचा फोलनवायडर आणि Goethe-Institut Indonesien ची टीम यांनी खूप चांगले मार्गदर्शन केले. त्यामुळेच गोदावरीताईंची ही गोष्ट आम्ही चित्रांतून मांडू शकलो.

हे पुस्तक आम्ही मराठवाड्यातील सर्व महिला शेतकऱ्यांना अर्पण करतो आहोत.


माझा जन्म १९७७ साली मराठवाड्यातल्या तुळजापूर तालुक्यात गंधोरा गावी झाला.
अहो दादा, मुलगी झाली.
माझे वडील, भीमाशंकर डांगे, हे गावातल्या शाळेत शिक्षक होते. आमची जात गुरव.
मी जन्मले तेव्हा बाबांना आनंद झालाच होता, पण काळजीही वाटत होती.


१९६० च्या दशकाच्या उत्तरार्धात भारत सरकारने शेतीच्या नवीन पद्धती अमलात आणल्या होत्या. त्यामुळे कोरड्या जमिनींचं रूप बदलून हिरवीगार भातशेती किंवा गव्हाची शेती दिसू लागली होती.
हरित क्रांती
पंजाब, हरयाणा आणि उत्तर प्रदेशातले शेतकरी हरितक्रांतीचं यश अनुभवत होते.
दिल्ली
गंगा नदी
भारत
महाराष्ट्र
मुंबई
गोदावरी नदी
पण आमच्या मराठवाड्यात आम्ही १९७२ च्या भयंकर दुष्काळाचे परिणाम भोगत होतो.
गोदावरी नदी ही लांबीने भारतातली दुसऱ्या क्रमांकाची नदी. जीवन देणारी आणि पोषण करणारी, म्हणून 'गोदामाई' या नावाने तिची पूजा होते. पण नेहमी येणाऱ्या दुष्काळामुळे ही नदी कोरडी पडली होती.
मराठवाडा
गंधोरा

मराठवाड्याच्या जनतेला इतका भयंकर दुष्काळ जवळपास अर्ध्या शतकानंतर सहन करावा लागत होता.



अनेक कुटुंबांनी कितीतरी दिवस अन्नपाण्याविना काढले. पाण्याच्या थेंबा-थेंबासाठी बायकांची भांडणं व्हायची.

अरे देवा,
पाणी संपलं.




घरकामात मदत करण्यासाठी
अनेक मुलींना शाळा सोडून
दयावी लागली.

शेतं उजाड झाली होती आणि उत्पन्नाचं दुसरं काही साधन नव्हतं म्हणून कुटुंबातल्या पुरुषांनी नोकरीच्या शोधात शहरांकडे स्थलांतर केलं.




मला शाळा खूप आवडायची. इतिहास माझा सगळ्यात आवडता विषय होता.


गंधोरा गावात मुलींना एकटीने घराबाहेर पाठवत नसत. माझी आई कधीच शाळेत गेली नव्हती. पण आपल्या मुलींनी शिकावं, अभ्यास करावा यासाठी ती नेहमी प्रोत्साहन द्यायची. माझा भाऊ सुनील, माझ्या बहिणी आणि मी – आम्हाला सर्वांना ती समान वागणूक द्यायची.
आकू, अभ्यास राहू दे आता. भाकरी खाऊन घे.

शाळा सुटली की मी आणि अर्चना गावभर फिरायचो. ती माझी एकदम खास मैत्रीण होती.

चल, सगळ्यात उंच फांदीवर चढू या.

कधी कधी तिची मनधरणी करावी लागायची...

....पण माझं धाडस आणि उत्साह पाहून तीही साथ द्यायची. आमची जोडी छान जमली होती!

आता थोडंच राहिलं!

आज ती तुळजापूरमधली पहिली महिला पोस्टमास्तर आहे.






कोणती शेतं 'उच्च' जातीच्या लोकांची असतील ते शेतातली हिरवाई बघून सहज ओळखू यायचं. मराठवाड्याच्या या दुष्काळी भागात श्रीमंत शेतकरी ऊस पिकवायचे. उसाच्या पिकाला भरपूर पाणी लागतं.




बहुतेक गरजू, अतीगरीब, अल्पभूधारक शेतकरी वंचित जातीचे असायचे. त्यांच्या जमिनी छोट्या आकाराच्या आणि कोरड्या असायच्या. पाऊस पडला नाही की पीक नाही, मग कर्ज घ्यायचं, हलाखीत जगायचं – या चक्रात हे शेतकरी अडकलेले असायचे. स्वतःकडची सगळी बचत ते बोअरवेल खोदण्यासाठी खर्च करायचे.




आक्, तिथे वर काय करतेयस? खाली ये, आईला मदत कर!
सुनील नेहमी आमच्या उत्साहावर पाणी टाकायचा.


त्या वर्षीसुद्धा पाऊस पडलाच नाही. पाणी भरण्यासाठी आम्हाला दोन किलोमीटर चालत जावं लागायचं.
लवकरच आमच्याकडचे पैसे संपत आले.


आई, तुझा आवडता हार तू का विकतेयस?
आपल्याला खायला काहीच नाही.
माझ्या बहिणीच्या लग्नात हुंडा देण्यासाठी घेतलेलं कर्ज वाढतच राहिलं.


त्यातच मला माध्यमिक शाळेत प्रवेश मिळाला. ती शाळा दुसऱ्या गावाला होती. तिथे जायला बसही नव्हती.
तिला इतक्या लांब शाळेत कसं पाठवणार?
शाळेतून काढू या तिला.


शाळेबाहेरचं आयुष्य खूप वेगळं होतं. मी आणि माझ्या बहिणी डोंगरावर जंगलात जाऊन शेण आणि लाकडं गोळा करायचो. आईला घरकामात मदत पाहिजेच होती.



मला शाळेत जाऊन शिकण्याची खूप इच्छा होती, पण घरकामातून वेळच मिळायचा नाही.



अनिता कुलकर्णी आमच्या शेजारी राहायच्या. त्या ब्राह्मण होत्या. त्यांच्या जातीत बायकांना घराबाहेर जाऊन काम करण्याची परवानगी नव्हती. पण त्या खूप स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या होत्या. त्या ट्रॅक्टर चालवायच्या, शेत नांगरायच्या आणि शेतीची सगळी कामं करायच्या.





कुलकर्णीताई सेंद्रिय शेती करायच्या. गावातले सगळे मोठे शेतकरी सोयाबीन आणि ऊस अशी नगदी पिकं घ्यायचे आणि विकून नफा कमवायचे.

कुलकर्णीताईंनी मला कडधान्य, ज्वारी-बाजरी, पालेभाज्या असं पिकवायला शिकवलं. त्या कधीच जंतुनाशक आणि रासायनिक खतं वापरायच्या नाहीत.



त्यांच्यासोबत मी शेतावर तासनतास काम करायची आणि सगळं शिकून घ्यायची – नांगरणी, पेरणी, कापणी.






त्या मला दिवसाला पाच रुपये द्यायच्या. मी अन्न पिकवण्याची संपूर्ण प्रक्रिया त्यांच्याकडून शिकले. किती मजा यायची तेव्हा!




शेतातली कामं खूप कठीणही होती.
कुलकर्णीताई आणि गावातल्या इतर
बायका शेतात अनेक तास राबायच्या.
पण त्यांना कधी 'शेतकरी' म्हणून ओळखलं जायचं नाही. जमिनीची मालकी गावातल्या पुरुषांकडेच असायची. ते बायकांना मजूर म्हणून राबवायचे.


एक छोटासा दाणा आपलं अन्न बनतो, शेतातून तो आपल्या थाळीत येतो हे पाहताना मला खूप आनंद व्हायचा. आता आम्हाला बाजारातून भाज्या आणि धान्य विकत आणायची गरज नव्हती.
हे बघ काय!


मी पुढची तीन वर्षं कुलकर्णीताईबरोबर खूप काम केलं. १९९४ साली शेतात काम करत असताना एक दिवस अचानक सुनीलने मला हाक मारली.



मग लवकरच २५ नवे चेहरे माझ्या आयुष्यात आले. श्रीधर क्षीरसागर यांच्याशी माझं लग्न झालं. ते माझ्यापेक्षा दहा वर्षांनी मोठे होते. मी १६ वर्षांची होते. मला गंधोरा गाव आणि कुलकर्णीताईचं शेत सोडून जावं लागलं.




माझ्या नव्या घरातलं आयुष्य खूपच वेगळं होतं. ते एक मोठं एकत्र कुटुंब होतं. माझा दिवस सकाळी खूप लवकर सुरू व्हायचा आणि रात्री उशिरा संपायचा. गंधोऱ्याला असताना आई आम्हाला सगळ्यांना एकत्र जेवायला बसवायची. पण या घरात पुरुष आणि मुलगे आधी जेवायचे.



आणि घरातल्या बायका उरलेल्या अन्नावर भागवायच्या. बऱ्याच वेळा अर्धपोटी झोपायला लागायचं.



पण माझे पती खूप चांगले आणि प्रेमळ होते.



आमच्या चार वर्षांच्या सहजीवनात आम्ही आमचं एक सुंदर जग निर्माण केलं होतं. आम्हाला दोन मुलगे झाले, शुभम आणि सुशांत.







पण अचानक माझ्या आयुष्याची सुरळीत चाललेली गाडी कचकन थांबली. १९९८ साली श्रीधर यांचा अपघाती मृत्यू झाला.







मी माझ्या माहेरी गंधोऱ्याला परत आले.



पुढचं अख्खं वर्ष सगळं धूसरच होतं. मी २१ वर्षांची होते, दोन मुलांची आई आणि एक तरुण विधवा.




मला एकदम धक्का बसला – माझ्या मुलांसाठी चॉकलेट घ्यायलाही माझ्याकडे पैसे नव्हते. त्यांच्या भविष्याचं काय?
मी माझं आयुष्य पुन्हा जगायला लागले, माझ्या मुलांसाठी, माझ्या मुलांच्या सोबतीने.

माझी आई गंधोरा गावातल्या बचत गटाची सदस्य होती. १९९३ साली जो मोठा भूकंप झाला, त्यानंतर हा बचत गट स्थापन झाला. भूकंपात मराठवाड्यातली जवळपास १०,००० माणसं मेली आणि हजारो लोकांची घरं आणि उत्पन्नाची साधनं गेली. पुढे आलेल्या दुष्काळात महिलांचे खूप हाल झाले. एक दिवस नसीमताईंनी आमच्या गावात मीटिंग घेतली.



त्या बायकांचं बोलणं ऐकून मला एक जाणीव झाली: मी एकटीच नव्हते.




थोडीफार शाळा शिकले त्याचा उपयोग झाला. पण गणित कठीण जायचं.



हळूहळू बेरीज-वजाबाकी जमू लागली. इतर बायकांशी बोलताना, त्यांचे अनुभव ऐकताना मला माझं आयुष्य नव्याने घडवण्यासाठी कारण सापडलं.

२००७ साली मराठवाड्यात पुन्हा दुष्काळ पडला. शेतीसाठी अगदी कमी पाणी उपलब्ध होतं. श्रीमंत शेतकरी त्यांची नगदी पिकं जगवण्यासाठी अगदी खोलपर्यंत बोअरवेल खणू लागले. येत्या वर्षात अनिश्चितता, नुकसान आणि भूक यांचा सामना करावा लागणार हे गरीब महिलांना स्पष्ट दिसत होतं.



अन्नधान्य पिकवायला महिलांना तयार करणं हे माझ्यासाठी कठीण काम होतं. त्यांचे नवरे त्यांना जमिनीचा अर्धा एकर तुकडाही त्यासाठी द्यायला तयार नव्हते. मला फक्त एकच व्यक्ती माहीत होती जी माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवेल – माझी मैत्रीण अर्चना.



अर्चनाने तिच्या जमिनीत मिश्र पिकं घ्यायला सुरुवात केली – ज्वारी-बाजरी, कडधान्य आणि पालेभाज्या. थोड्या पाण्यावरच ती पिकं चांगली तयार झाली.

ही गोष्ट जसजशी पसरली, तसतशा इतर महिला त्यांच्या छोट्या जमिनीच्या तुकड्यांवर ही पिकं घ्यायला पुढे येऊ लागल्या.

हे मुळे, तूर आणि शेंगा लावून पाहा. आधी जमिनीची चांगली मशागत करून घ्या.


उस्मानाबादच्या कृषी विज्ञान केंद्रातल्या वैज्ञानिकांना आम्ही वेळोवेळी बोलवायचो. कमी पाणी वापरून शेतीतून चांगलं उत्पन्न कसं मिळवायचं त्याच्या पद्धती त्यांनी सांगितल्या. त्यांच्या सल्ल्याने आमचे शेतकरी त्यांच्या जमिनीच्या तुकड्यांत ठिबक सिंचन, पाणी शिंपडणारे फवारे वगैरे वापरू लागले.



आमच्या शेतकरी महिलांना आता दुष्काळाची भीती वाटेनाशी झाली. प्रयोगशाळेतून आमचं मॉडेल प्रत्यक्ष जमिनीवर आल्यावर किती यशस्वी झालं ते सर्वांच्या डोळ्यांसमोर होतं.




अशा प्रकारे अनेक वर्षं काम केल्यानंतर स्थानिक हवामानाचे पॅटर्न आणि महिलांवर असणारे सामाजिक दबाव यांचा विचार करून आम्ही 'वन एकर मॉडेल' बनवलं. त्यामध्ये ३६ प्रकारची कोरडवाहू आणि अल्प काळात तयार होणारी पिकं अर्ध्या ते एक एकर जमिनीवर घेतली जायची – पालेभाज्या, ज्वारी-बाजरी, कडधान्य वगैरे. ऋतुमानानुसार आम्ही वेगवेगळी बियाणी वापरायचो. आमचं उद्दिष्ट एकच होतं – सर्वांना वर्षभर खायला मिळालं पाहिजे.



पण सगळ्या महिलांना हे करणं सोपं नव्हतं. गावातले 'उच्च' जातीचे प्रमुख पुरुष, फारशी मदत न करणारे सरकारी अधिकारी आणि घरात मारझोड करणारे नवरे या सर्वांना तोंड द्यावंच लागत होतं.



'वन एकर मॉडेल'ची खरी परीक्षा झाली ती २०१२ च्या दुष्काळात. मराठवाड्यात ४० वर्षांत झाला नव्हता असा दुष्काळ त्या वर्षी पडला. शेतीसाठी सोडाच, प्यायलाही पाण्याचा थेंब नव्हता. सरकारने पाठवलेले टँकर आणि खासगी पाणी विकणारे यांच्यावर आमची भिस्त होती. येणारा प्रत्येक दिवस एक आव्हानच होता.



या दुष्काळात नगदी पिकं घेणाऱ्या शेतकऱ्यांचं खूप नुकसान झालं. शेतात उभा असलेला ऊस सुकून जाऊ लागला. कर्जबाजारी झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. पण याच काळात आमच्या महिला शेतकरी तगून राहिल्या.




मला खूप आनंद याचा झाला, की आमच्या अनेक महिला शेतकरी आता स्थानिक पातळीवर नेत्या बनू लागल्या. त्यांनी इतर शेतकऱ्यांना आमचं 'वन एकर मॉडेल' स्वीकारून शेती करायला प्रवृत्त केलं. पुरुषांनाही अन्नधान्य पिकवण्याचं महत्त्व पटलं आणि ते आम्हाला पाठिंबा देऊ लागले. आम्ही या महिलांना सरकारी योजना आणि सबसिडीचा लाभ मिळवून दिला, आणि स्थानिक बाजारात विक्री करण्यासाठी मदत केली. यामुळे महिलांची मिळकत आणि बचत वाढू लागली.




२००७ मध्ये सात शेतकऱ्यांनी सुरू केलेलं हे मॉडेल आता ६०,००० महिला शेतकऱ्यांनी स्वीकारलं आहे आणि त्यानुसार त्या शेती करत आहेत.

स्थानिक पातळीवर मिळालेलं हे यश या क्षेत्रातल्या संस्था आणि जगभरात काम करणारे कार्यकर्ते यांना सांगण्याची मला संधी मिळाली. इतर देशांमध्ये लोक 'क्लायमेट चेंज' म्हणजे हवामान बदलाचा सामना कसा करत आहेत ते त्यांच्याकडून शिकायला मिळालं.




गेल्या दहा वर्षांत मी १७ देशांत फिरले. मी विमानातून प्रवास करताना खाली पाहत राहते - गंधोरा गावातल्या महिला शेतकऱ्यांनी कष्टाने आणि हिमतीने पिकवलेली हिरवीगार शेतं दिसतायत का, म्हणून!
अमेरिका सोडा हो, मी दिल्लीला सुद्धा गेलेली नाही.
मी गंधोरा गावातून कधी बाहेरच पडली नाही.
आम्हाला तिचा खूप अभिमान वाटतो.

COVID-19 ची साथ सुरू झाली, तेव्हा बाजार बंद केले गेले आणि राज्यांच्या सीमाही बंद करण्यात आल्या. भूक आणि अनिश्चितता पुन्हा एकदा वाढू लागली. नगदी पिकं घेणाऱ्या मोठ्या शेतकऱ्यांना पुन्हा नुकसान सहन करावं लागलं – त्यांचा माल विकायला बाजारपेठच नव्हती.



आमच्या महिला शेतकऱ्यांची उमेद मात्र कायम होती. त्यांच्या एक एकर जमिनीत त्यांनी पिकवलेलं धान्य आणि भाजीपाला त्यांच्या कुटुंबाचं पोषण करायला पुरेसा होता. काही महिलांनी त्यांच्या शेतातला जास्तीचा माल स्थानिक बाजारात विकून पैसेही कमावले. विजयालक्ष्मी सखी प्रोडुसर कंपनीच्या भागधारक असलेल्या या महिलांनी त्यांच्या मालाला योग्य भाव मिळवण्यासाठी बाजारातल्या पुरुषप्रधान वातावरणात हुज्जतही घातली.

आम्ही या प्रवासात खूप पुढे आलो आहोत, पण अजून बरीच लढाई बाकी आहे. 'वन एकर मॉडेल' गावागावात पोहोचायला हवं. प्रत्येक घरातल्या बायकांना उत्पादक आणि जमिनीच्या मालक म्हणून ओळखलं जायला हवं. एकत्रित काम केलं तर हे नक्की शक्य होईल.





रीतिका रेवती सुब्रमणियन

ही पत्रकार आणि संशोधक आहे. मूळची मुंबईची असलेली रीतिका सध्या केम्ब्रिज युनिव्हर्सिटीमध्ये 'गेट्स केम्ब्रिज स्कॉलर' म्हणून जेन्डर स्टडीज या विषयात पीएच डी करते आहे. भारतातील हवामान बदल, मजुरांचे स्थलांतर आणि लिंगभेदाशी संबंधित हिंसा अशा विषयांवर संशोधन करण्यात तिला विशेष रस आहे.



मैत्री डोरे

ही मुंबई-स्थित आर्किटेक्ट आणि मुक्त-चित्रकार आहे. तिच्या चित्रांतून तिला वंचित जनसमूहांच्या जीवनाचा संघर्ष व्यक्त करायचा आहे. विशेषतः लिंगभेद, जात आणि धर्म यांमुळे लोकांवर होणाऱ्या परिणामांवर तिला लक्ष केंद्रित करायचे आहे. सध्या ती स्वीडनमधील गॉथनबर्ग युनिव्हर्सिटीमध्ये सांस्कृतिक वारशांचे जतन या विषयात पीएच डी करते आहे.